Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हा सरदार पटेलांचा भारत, तो आपल्या सुरक्षा आणि सन्मानाशी तडजोड करत नाही- पंतप्रधान मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ एकता नगर गुजरात**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज शुक्रवारी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकता नगरजवळील सरदार पटेल यांच्या १८२ मीटर उंच पुतळ्याला मोदींनी पुष्पहार अर्पण केला.

कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, सरदार पटेल यांनी अशक्य ते शक्य केले. 'एक भारत, सर्वोत्तम भारत' ही कल्पना त्यांच्यासाठी सर्वोपरि होती. म्हणूनच आज, सरदार पटेल यांची जयंती, स्वाभाविकपणे राष्ट्रीय एकात्मतेचा एक भव्य उत्सव बनली आहे.

मोदी म्हणाले, हा सरदार पटेलांचा भारत आहे, जो कधीही त्याच्या सुरक्षेशी आणि सन्मानाशी तडजोड करत नाही. संपूर्ण जगाला माहित आहे की आज जर कोणी भारताकडे वाईट नजरेने पाहण्याचे धाडस केले तर भारत पूर्वीपेक्षा अधिक कडक प्रत्युत्तर देतो.

त्यांच्या भाषणापूर्वी, पंतप्रधानांनी राष्ट्रीय एकता दिनाच्या परेडमध्ये सलामी घेतली. परेडमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व तुकड्यांचे नेतृत्व महिला अधिकाऱ्यांनी केले. बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, सीआरपीएफ आणि सीमा सुरक्षा दलासह १६ तुकड्यांनी परेडमध्ये भाग घेतला.

या परेडमध्ये ऑपरेशन सिंदूरमधील १६ बीएसएफ पदक विजेते आणि सीआरपीएफचे पाच शौर्य चक्र विजेते देखील सहभागी झाले होते. परेडचे नेतृत्व १०० सदस्यांच्या पथकाने केले, तर नऊ बँड पथके आणि चार शालेय बँडने परेडमध्ये सादरीकरण केले.मोदी पुढे म्हणाले, दुर्दैवाने, मागील सरकारांनी या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले आणि त्याकडे डोळेझाक केली. मागील सरकारांनी मतपेढीच्या राजकारणासाठी राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणली. पहिल्यांदाच, देशाने या आव्हानाचा थेट सामना करण्यासाठी आणि त्याची अखंडता जपण्यासाठी एक ठाम आणि निर्णायक भूमिका घेतली आहे.

पंतप्रधान म्हणाले, मी लाल किल्ल्यावरून डेमोग्राफिक मिशनची घोषणा केली. पण आज जेव्हा आपण हा मुद्दा गांभीर्याने उपस्थित करत आहोत, तेव्हा काही लोक राष्ट्रीय हितापेक्षा स्वतःचे स्वार्थ अधिक महत्त्व देत आहेत. हे लोक घुसखोरांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी राजकीय लढाई लढत आहेत.

पंतप्रधान म्हणाले, काँग्रेसने कधीही सरदार पटेलांच्या धोरणांचे पालन केले नाही. त्यामुळे देशाला हिंसाचार आणि रक्तपाताच्या स्वरूपात त्याचे परिणाम भोगावे लागले. सरदार पटेल यांना काश्मीर एक व्हावे अशी इच्छा होती, जसे त्यांनी इतर संस्थानांना एकत्र केले होते. परंतु नेहरूंनी त्यांची इच्छा पूर्ण होण्यापासून रोखले.

## राहुल गांधी यांचे पंतप्रधान मोदींना थेट आव्हान; म्हणाले हिंमत असेल तर सांगावे की ट्रम्प यांनी युद्ध थांबविले नाही म्हणून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१पाटणा**



बिहार विधानसभा निवडणूक जवळ येत असल्याने येथे राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहचला आहे. यादरम्यान बिहारमध्ये एका प्रचार सभेत बोलताना राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे वारंवार भारत आणि पाकिस्तान यांच्यातील 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पेटलेला संघर्ष आपण थांबवला असल्याचे सांगत आले आहेत. दरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी यांनी या मुद्द्यावरू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. आपण भारत-पाकिस्तान संघर्ष थांबवला या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या दाव्यावर त्यांन जाब विचारण्याची 'हिंमत' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात नाही, असे राहुल गांधी गुरूवारी म्हणाले आहेत.

बिहारमधील नालंदा आणि शेखपुरा येथील रॅलींना संबोधित करताना राहुल गांधी यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. त्यांनी बिहारमधील पेपरफुटी आणि खराब आरोग्य सेवांचा मुद्दा उपस्थित केला. पुढे बोलताना राहुल गांधींनी पंतप्रधानांना ळक्ष्य केले मोदी यांनी अमेरिकेला भेट देणे अपेक्षित होते. पण ते जात नाहीयेत कारण त्यांना ट्रम्प यांची भीती वाटते असा आरोप राहुल गांधी यांनी केला. ते पुढे म्हणाले की, जर पंतप्रधानांमध्ये हिंमत असेल, तर त्यांनी सांगावे की ट्रम्प यांनी ऑपरेशन सिंदूर थांबवले नाही.

राहुल गांधी म्हणाले की, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी हे एका धाडसी नेत्याचे उदाहरण होत्या. जर तुम्हाला पंतप्रधान कसा असावा हे समजून घ्यायचे असेल तर तुम्ही इंदिरा गांधींनी १९७१ साली काय केले होते ते पाहावे, जेव्हा त्यांनी तात्कालीन अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सांगितले होते की, आम्ही तुम्हाला घाबरत नाहीत, असेही राहुल गांधी म्हणाले.

## शेतकऱ्यांना ३००० रुपये पाटण्याजवळ नवं शहर अन्

### बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'संकल्प पत्रात' एनडीए नं दिली मोठी आश्वासनं



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१पाटणा**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी एनडीएने आपले संकल्पपत्र जाहीर केले आहे. यात रोजगार, शेती विकास आणि पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. भाजप, जेडीयू आणि इतर पाच पक्षांच्या आघाडीने एकत्रितपणे हे संकल्पपत्र सादर केले असून, पुन्हा सत्ता मिळाल्या, राज्यातील शेतकरी, युवक आणि गरीब वर्गासाठी मोठे आणि महत्वाचे निर्णय घेतले जातील, असे आश्वासन देण्यात आले आहे.

मुख्यमंत्री नीतीश कुमार आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह एनडीएतील काही वरिष्ठ नेत्यांनी शुक्रवारी पाटणा येथे एनडीएचे संकल्पपत्र जारी केले. यात, बिहारमध्ये पुन्हा एकदा एनडीए सरकार आल्यास शेतकऱ्यांना केंद्राच्या योजनेव्यतिरिक्त, राज्य सरकारकडूनही ३००० रुपयांचा अतिरिक्त सन्माननिधी दिला जाईल. यामुळे शेतकऱ्यांना एकूण ९००० रुपये वार्षिक मदत मिळेल. तसेच तांदूळ, गहू, मका आणि डाळी यांसारख्या सर्व प्रमुख पिकांची खरेदी पंचायत स्तरावर किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) केली जाईल. तसेच, राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाटी शेती क्षेत्राशीसंबंधित पायाभूत सुविधांवर एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल.

एनडीएने पुढील पाच वर्षांत एक कोटी लोकांना नोकरी आणि रोजगार देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. प्रत्येक जिल्ह्यात उद्योगधंदे उभारले जातील, तसेच मागास समाजातील विविध व्यावसायिक गटांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल. असे आश्वासनही या संकल्पपत्रात देण्यात आले आहे.याशिवाय, पायाभूत सुविधांसाठी सात नवे एक्सप्रेसवे, ३६०० किलोमीटर रेल्वेमार्गाचे आधुनिकीकरण, चार शहरांत मेट्रो सेवा आणि दहा नव्या विमानतळांची उभारणी करण्यात येईल. तसेच दरभंगा आणि पूर्णिया येथून आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू करण्यात येतील. याच बरोबर, राजधानी पटण्याजवळ न्यू पाटणा ग्रीनफिल्ड शहर उभारले जाईल, असेही एनडीएने म्हटले आहे.

एनडीएने आपल्या संकल्पपत्रात, सीतामढीत पुनौरा धामला 'सीतापुरम' ही जागतिक दर्जाची धार्मिक नगरी बनवण्याची घोषणाही करण्यात आली आहे. तसेच, गरीब विद्यार्थ्यांना केजीपासून पीजीपर्यंत मोफत शिक्षण, सरकारी शाळांमध्ये मिड-डे मीलसह पौष्टिक नाश्ता, शाळांमध्ये आधुनिक कौशल्य प्रयोगशाळा तयार केल्या जातील, आदी आश्वासने एनडीएने दिली आहेत.

## बच्चू कडूंच्या 'हवा महल'ची चौकशी करा भाजपचे आमदार प्रवीण तायडेंची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**



शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर नागपुरात 'महाएल्गार' आंदोलन पुकारणारे प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यावर अचलपूर मतदारसंघाचे भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांनी गंभीर आरोप केले आहेत.

बच्चू कडूंनी सत्तेच्या काळात मंत्रिपदाचा गैरवापर करून अमरावती जिल्ह्यात टुमदार बंगला, फार्म हाऊस, कारखाना उभारल्याचा आणि मुंबई, नागपूरसह इतरही शहरांमध्ये मालमत्ता गोळा केल्याचा आरोप प्रवीण तायडे यांनी केला आहे. त्यांच्या संपूर्ण मालमत्तांची चौकशी करावी, अशी मागणी प्रवीण तायडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

बच्चू कडू यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. राज्यात भाजपची सत्ता आहे. त्यांनी आपली ईडीमार्फत चौकशी करावी, वाटल्यास मला तुरूंगात डांबावे, असे प्रत्युत्तर दिले आहे.

बच्चू कडू हे महाविकास आघाडी सरकारमध्ये राज्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी मालमत्ता गोळा केली. प्रशस्त बंगला, फार्म हाऊस, जलतरण तलाव, एक कारखाना ही मालमत्ता त्यांच्याकडून कुठून आली याची चौकशी झाली पाहिजे, असे प्रवीण तायडे यांचे म्हणणे आहे. ज्या लोकांच्या नावाने ही मालमत्ता गोळा करण्यात आली, त्यांचीही चौकशी करावी, असे प्रवीण तायडे यांनी सांगितले.

प्रवीण तायडे यांनी विधानसभा निवडणुकीत बच्चू कडू यांचा पराभव केला. ते बच्चू कडू यांच्यावर सातत्याने आरोप करीत आहेत. त्यात आता या नव्या आरोपांची भर पडली आहे. गेल्या वर्षाअखेरीस बहिरम यात्रेदरम्यान देखील बच्चू कडू आणि प्रवीण तायडे यांच्यात वादाची ठिगणी उडाली होती. दोघांमध्ये आरोप, प्रत्यारोप झाले.

**आरोप फेटाळले**

दरम्यान, बच्चू कडू यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपल्या विरोधकांचे टीका करण्याचे, आरोप करण्याचे कामच आहे. त्यांनी आपले काम करीत रहावे, पण, जनतेला सर्वकाही माहित आहे. राज्यात भाजपची सत्ता आहे. भाजपने आपल्या सर्व मालमत्तांची चौकशी करावी, 'ईडी'मार्फत चौकशी करावी, असे आव्हान बच्चू कडू यांनी दिले आहे.

गेल्या काही दिवसांपासून बच्चू कडू यांनी पुकारलेले आंदोलन चर्चेत आहे. 'आमदारांना कापा' असे वादग्रस्त वक्तव्य बच्चू कडू यांनी काही दिवसांपुर्वी केले होते, त्यावरही प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांच्यावर कठोर शब्दात टीका केली होती. त्यांनी आपल्या घरी येऊन दाखववावे, असे आव्हान देखील त्यांनी दिले होते. बच्चू कडू यांना आताच शेतकऱ्यांचा कळवळा कसा आला, सत्तेत असताना ते कुठे होते, असा सवाल तायडे यांनी केला.

## संजय राऊत दोन महिने राहणार सार्वजनिक जीवनापासून दूर

### समोर आलं चिंताजनक कारण, निवडणुकांच्या तोंडावर ठाकरे गटाची चिंता वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासह मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचं बिगुल लवकरच वाजणार आहे. गेल्या दोन तीन वर्षांपासून अनेक आव्हानांचा सामना करत असलेल्या शिवसेना ठाकरे गटासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याने पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसह सर्व नेत्यांनी या निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. मात्र या निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीपूर्वी शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. विरोधकांवर तुटून पडणारी शिवसेना ठाकरे गटाची मुलुखमैदानी तोफ असा लौकिक असलेले ठाकरे गटाचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत हे पुढचे दोन महिने सार्वजनिक जीवनापासून दूर राहणार आहेत. स्वत: संजय राऊत यांनी पत्र लिहून याबाबतची माहिती दिली असून, त्यामागचं चिंताजनक




कारणही समोर आलं आहे.

या पत्रात संजय राऊत यांनी सार्वजनिक जीवनापासून दूर राहण्यामागचं कारण सांगताना लिहिलंय की, आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले, पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचे समोर आले आहे. उपचार सुरू आहेत, मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणे व गर्दीत मिसळणे यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे मी ठणठणीत बरा होऊन साधारण नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच राहू द्या, असे आवाहन संजय राऊत यांनी .पत्राच्या शेवटी केले आहे.

दरम्यान, संजय राऊत यांनी या पत्रामधून त्यांच्या आजारपणाबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही. मात्र राऊत यांनी दिलेल्या या माहितीमुळे निवडणुकांची रणधुमाळी तोंडावर असताना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. तसेच शिवसैनिकांमध्येही चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

## राज-उद्धव ठाकरेंच्या मोर्चाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली

### परवानगीविनाच मोर्चा काढलात तर.... भाजप नेत्याचा थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ मुंबई**

मतचोरी, मतदार यादीतील गोळ, दुबार मतदार आणि निवडणुकांमधील गैरव्यवहाराच्या विरोधात विरोधक एकवटले आहेत. महाविकास आघाडी आणि मनसे यांनी एकत्रित येत उद्या (दि. ०१ नोव्हेंबर) निवडणूक आयोगाच्या विरोधात सत्याचा मोर्चा काढण्याचं जाहीर केलं आहे. या मोर्चाला मनसे प्रमुख राज ठाकरे , शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार , काँग्रेस नेते, डाव्या पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत. मोर्चा दुपारी १ वाजता फॅशन स्ट्रिटवरून सुरू होईल. मेट्रो सिनेमामार्ग मुंबई महापालिकेच्या प्रवेशद्वारावर थांबेल. मुंबईकरांना त्रास होऊ नये, यासाठी दुपारी १ ते ४ या वेळेत मोर्चा निघणार आहे. मात्र, महाविकास आघाडी आणि मनसेच्या उद्याच्या मोर्चाला पोलीस परवानगी देणार नसल्याची माहिती समोर येत आहे.

महाविकास आघाडी आणि त्यांना समर्थन देणाऱ्या इतर पक्षांचा उद्या मुंबईत महामोर्चा निघणार आहे. या मोर्चाला सत्याचा मोर्चा असे नाव देण्यात आले आहे. या मोर्चासाठी




महाविकास आघाडीने मुंबई पोलिसांकडे परवानगी पत्र पाठविले आहे. मात्र मुंबई महापालिकेचा मार्ग आणि आझाद मैदाचा परिसर येथून कुठलाही मोर्चा काढता येणार नाही. आझाद मैदानाच्या आत मोर्चा काढण्याची परवानगी आहे. त्यामुळे नियमानुसार आझाद मैदानाच्या बाहेर मोर्चा निघणार असेल तर त्याला परवानगी देता येणार नाही, अशी भूमिका पोलिसांनी घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे अद्याप या मोर्चा पोलिसांकडून परवानगी मिळालेली नाही. आता पोलिसांकडून मोर्चाला परवानगी मिळत नसल्याने महाविकास आघाडी आणि मनसेचा मोर्चा विनापरवानगी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**विनापरवाना मोर्चा काढला तर...**

त्यातच आता राज्याचे महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाविकास आघाडी आणि मनसेला थेट इशारा दिला आहे. उद्याला मनसे व महाविकास आघाडीने विनापरवाना मोर्चा काढला तर नियमाप्रमाणे कारवाई होईल, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. त्यामुळे विरोधक नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## कार शिकतांना ब्रेकच्या ऐवजी एक्सीलेटर दाबला, ट्रकला जोरदार धडक; ५ जणांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातील वणी घुग्गुस मार्गावर एक हृदयद्रावक अपघाताची घटना घडली. कार आणि ट्रकचा भीषण अपघात घडला. या भीषण धडकेत एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू झाला. हा भीषण अपघात जन्नत सेलिब्रेशन हॉलपासून काही अंतरावर घडला. मुलीला कार शिकवताना हा दुर्देवी प्रसंग घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वणीतील लालपुलिया परिसरात राहणारे रियाज शेख हे व्यावसायिक ट्रक दुरूस्तीचे काम करीत होते. त्यांचे स्वत:चे गॅरेज होते. ते आपल्या मुलीला कार चालविण्याचं प्रशिक्षण देत होते. कार शिकवण्यासाठी ते आपल्या मुलीला घुग्गुस मार्गावर घेऊन गेले होते. दरम्यान, जन्नत हॉलजवळ मुलीचे कार चालवताना नियंत्रण सुटले. तिनं ब्रेकऐवजी एक्सीलेटर दाबलं.




कार थेट दुभाजकावरून उसळून महामार्गाच्या विरूद्ध दिशेनं गेली. तसेच समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. कारचा समोरील भाग अक्षरश: चक्काचूर झाला. या भीषण अपघातात कारमधील ४ मुलींचा मृत्यू झाला. तर, रियाज यांचा रूग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृतांमध्ये रियाज यांच्या भावाच्या मुलाचाही समावेश आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मायरा शेख (वय वर्ष १७), अनिबा (वय वर्ष ११), झोया (वय वर्ष १३), लियाबा आणि रियाज (वय वर्ष ५४) अशी मृतकांची नावे आहेत.

## संपादकीय ......

# 'त्रिशूल' सरावाचा गर्भितार्थ


भारत-पाकिस्तान या शेजारी देशांमधील वैराचे केंद्रबिंदू गेल्या अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीर आणि नियंत्रण रेषा (एलओसी) हेच राहिले आहेत. पाकिस्तानच्या आश्रयाने चालणार्या दहशतवादी कारवाया, काश्मीर खोर्यातील हिंसाचार आणि सीमाभागातील घुसखोरी या सार्यांनी या संघर्षाला एक पारंपरिक स्वरूप दिले. मात्र, या वैराच्या भूगोलात आता महत्त्वाचा बदल दिसू लागला आहे. भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांचा संयुक्त युद्धसराव 'त्रिशूल' यावर्षी ३० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत पश्चिम सीमाभागात सुरू झाला असून, त्याचे केंद्रबिंदू बनले आहे गुजरातमधील सर क्रिक हे ठिकाण. प्रत्यक्षात ही दलदलीने व्यापलेली खाडी आता नव्या भारत-पाकिस्तान संघर्षाचे संवेदनशील मैदान ठरते आहे. या सरावासाठी राजस्थान-गुजरात सीमाभागात प्रचंड हवाई क्षेत्र बंद ठेवले आहे. पाकिस्ताननेही दक्षिण-मध्य भागातील हवाई क्षेत्रावर उड्डाणबंदी लागू केली आहे. हे निर्णय दोन्ही देशांच्या लष्करी हालचालींमध्ये वाढ झाल्याचे संकेत देतात. पाकिस्तानकडून मिसाईल चाचणी किंवा सराव सुरू असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हवाई बंदीने 'ऑपरेशन सिंदूर'नंतरच्या तणावाच्या आठवणी जाग्या केल्या आहेत.

भारतीय लष्कराच्या म्हणण्यानुसार, हा सराव वार्षिक स्वरूपाचा असला, तरी यामागे काही सामरिक संदेश देण्याचा इरादा दिसत आहे. सरावासाठी सर क्रिकची निवड केल्याने पाकिस्तानी घुसखोरी अथवा समुद्रमार्गे होणार्या धोक्यांना आळा घालण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे. गेल्या काही महिन्यांत पाकिस्तानकडून सर क्रिक परिसरात लष्करी पायाभूत सुविधा वाढविल्याची माहिती आहे. पाक नौदलप्रमुखांनी अलीकडेच या भागाचा दौरा करून सैन्याची तयारी तपासली होती. या प्रदेशात पाकिस्तानी लष्कर आणि नौदल यांचा वावर वाढलेला असून, भविष्यात लष्करीदृष्ट्या या प्रदेशातून हल्ले करणे सोपे जावे, यासाठीची तयारी असू शकते. याच पार्श्वभूमीवर भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला दिलेला कठोर इशारा लक्षवेधी ठरला. सर क्रिक परिसरात पाकिस्तानकडून कुठलीही आक्रमक कारवाई झाली, तर भारताचा प्रतिसाद असा असेल की, इतिहास आणि भूगोल दोन्ही बदलतील, असे त्यांनी म्हटले होते.

सर क्रिक ही गुजरातच्या कच्छच्या रण आणि पाकिस्तानच्या सिंध प्रांतादरम्यान असलेली सुमारे ९६ किलोमीटर लांबीची अरुंद खाडी आहे. बि-टिश काळात हिला 'बाणगंगा' असे स्थानिक नाव होते; परंतु नंतर बि-टिश अधिकार्याच्या नावावरून तिला सर क्रिक असे नाव देण्यात आले. वरकरणी निर्जन, साप-विंचू व स्थलांतरित पक्ष्यांचे निवासस्थान वाटणारा हा प्रदेश, प्रत्यक्षात भारत-पाकिस्तान सीमासंबंधातील अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. या भागातील वाद केवळ दलदलीच्या पट्ट्याबाबत नाही, तर जमिनीच्या सीमारेषेचा समुद्राशी मिळणारा बिंदू नेमका कुठे आहे, यावर आहे. कारण, या रेषेवरूनच दोन्ही देशांच्या एक्सक्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन म्हणजेच विशेष आर्थिक क्षेत्रांची सीमा ठरते. ही मर्यादा सुमारे ३७० कि.मी.पर्यंत समुद्रात विस्तारते. त्यामुळे यावर मच्छीमार अधिकार, समुद्रतळातील तेल-गॅस संसाधने आणि आर्थिक सार्वभौमत्व यांचा प्रश्न उभा राहतो. अभ्यासांनुसार, जर भारताचा 'मध्य प्रवाह' सिद्धांत मान्य झाला, तर पाकिस्तानला सुमारे २,२४६ चौ.कि.मी. आर्थिक क्षेत्र गमवावे लागू शकते. भारताचा दावा आहे की, १९१४ च्या एका ठरावाच्या दहाव्या परिच्छेदानुसार सर क्रिक ही नौसंचारक्षम खाडी असल्याने, मधल्या प्रवाहावरून सीमारेषा आखली पाहिजे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' विशेष स्वरूपात साजरा होणार!

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर राष्ट्रीयएकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्यस्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीकअसून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीयकार्याला अभिवादन करणार आहे.एकतानगर येथे भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधीलनर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण विविधतेत एकता याभारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्रपोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिकउत्सव आयोजित करण्यात आला आहे.राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचे सादरीकरण या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत-तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र,पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल.घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्य प्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके



या परेडची शोभा वाढवतील.महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्री यांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचेनेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आणि केंद्रीय राखीव बल च्या महिलाकर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य,शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल. राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणिमुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीसश्वान स्पर्धेत विजेती ठरलेली 'मुधोल हाउंड रिया' या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल.याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमा सुरक्षाबल चे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड एकतेतच शक्ती आहे हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील. भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो यापरेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.

**विविधतेत एकतासंदेश देणारे संचलन** – राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन 'विविधतेतएकता' या विषयाचे दर्शन घडवतील.या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर,अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुद्दुचेरी यांच्या संचालनाचासमावेश असेल.यासह सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सशस्त्र सीमाबल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिकरंग भरतील.या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल चे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमा सुरक्षा बल चे १६वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधीमोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शनघडविले आहे. परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपराआणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल.राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढकरणे हे आहे. हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्याभावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो. १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे 'भारतपर्व' आयोजित करण्यात येईल. या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सवआयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप१५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केलाजाईल.

**– वर्षा फडके-आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**

# ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शेतकरी कर्जमाफीचा निर्णय झाला; समितीने केलेल्या शिफारसीच्या आधारावर पुढील प्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१मुंबई–** राज्यातील शेतकऱ्यांना ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती आम्ही गठीत केली आहे.

एप्रिलपर्यंत या समितीने शिफारस करायची आहेत. त्या आधारावर पुढची प्रक्रिया करून तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.सह्याद्री अतिथीगृह येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळ सोबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

मुख्यमंत्री म्हणाले, नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक आहे, कारण तसे केले नाही तर रब्बीची पेरणी त्यांना करता येणार नाही. म्हणून आता ३२ हजार कोटींच्या पॅकेज वितरण याला प्राधान्य आहे.

पूर्व अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पॅकेजच्या माध्यमातून ३२ हजार कोटी रूपये मदत दिली जात आहे. आत्तापर्यंत ८००० कोटी रुपये खात्यात दिले गेले आहेत.

या आठवड्याअखेर १८,५०० कोटी रुपये दिले जाणार असून पंधरा दिवसात ९० टक्के शेतकऱ्यांच्या थेट खात्यात रक्कम जाईल या दृष्टीने तरतूद





केली असून निर्देश दिले आहेत.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आमच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचा निर्णय होता. पण ही तात्कालिक बाब आहे. दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे.कर्जाची वसुली जूनपर्यंत होते, त्यामुळे जूनपर्यंत मुदत आहे. याबाबत आंदोलकांशी झालेल्या सकारात्मक चर्चा झाली असून या भूमिकेशी सर्व नेत्यांनी सहमती दर्शवली आहे. अन्य विषयांवर पुढच्या आठवड्यात बैठक घेणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की कर्जमाफी कशी करायची याबाबत एप्रिलपर्यंत समिती शिफारस करेल शिफारशीच्या आधारावर पुढच्या तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करणार.नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक असून रब्बीची पेरणी करता यावी, म्हणून आता ३२ हजार कोटींच्या पॅकेज वितरणास प्राधान्य आहे.




## आतड्यांचे शत्रू! खाताय 'हे' पदार्थ? वेळीच सावध व्हा, नाहीतर होईल नुकसान

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**
आपले पोट आणि आतडे हे शरीराचे दुसरे मेंदू मानले जातात. आतड्यांचे आरोग्य चांगले असेल तर रोगप्रतिकारशक्ती, मानसिक आरोग्य आणि एकूणच शारीरिक आरोग्य उत्तम राहते. मात्र, आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आपण काही अशा गोष्टींचे सेवन करतो, ज्यामुळे आपल्या आतड्यांचे आरोग्य धोक्यात येते.



आपल्या खाण्यातील ५ गोष्टी आतड्यांच्या आरोग्यासाठी सर्वात मोठे शत्रू आहेत. या गोष्टींमुळे पोटाला सूज, बद्धकोष्ठता, सिडिटी आणि लठ्ठपणा यांसारख्या समस्या वाढतात.

**आतड्यांचे आरोग्य बिघडवणारे ५ सर्वात हानिकारक पदार्थ–** १. डीप फ्राइड फूड्स तळलेले पदार्थ पचायला खूप जड असतात. यामुळे आतड्यांतील सूज वाढते आणि 'बॅड बॅक्टेरिया' वाढण्यास मदत होते. यामुळे सिडिटी आणि जळजळ होते.

२. प्रोसेस्ड मीट सॉसेज, बेकन, आणि प्रक्रिया केलेले मांसाहार यांमध्ये नायट्रेट्स आणि प्रिझर्व्हेटिव्ह्ज जास्त असतात. हे घटक आतड्यांतील चांगल्या बॅक्टेरियाला मारतात आणि कॅन्सरचा धोका वाढवू शकतात.

३. शुगरी ड्रिंक्स आणि कृत्रिम गोड पदार्थ सोडा, पॅकेज्ड ज्यूस आणि कृत्रिम गोड पदार्थ आतड्यांतील मायक्रोबायोमचे संतुलन बिघडवतात. यामुळे हानिकारक बॅक्टेरियाची संख्या वाढते, ज्यामुळे पोटाचे आरोग्य खराब होते.

४. अल्ट्रा-प्रोसेस्ड फूड्स चिप्स, पॅकेज्ड स्नॅक्स, आणि रेडी-टू-ईट फूड्समध्ये फायबर आणि पोषणमूल्ये कमी असतात, पण मीठ, साखर, चरबी आणि कृत्रिम डिटिव्ह्ज जास्त असतात. हे पदार्थ आतड्यांतील 'चांगल्या' बॅक्टेरियाला पोसण्याऐवजी भूक वाढवतात.

५. रिफाईंड आटा आणि धान्ये मैद्यापासून बनवलेले पदार्थ (उदा. पास्ता, ब्रेड, बिस्किट्स) यात फायबर जवळजवळ नसते. यामुळे पचनक्रिया मंदावते, बद्धकोष्ठता वाढते आणि रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढते.

आपल्या आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी खालील गोष्टींचा समावेश करा:

**फायबर युक्त आहार:** ताजी फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये (थहेश्रश त्र्रीरळपी) आणि डाळी यांचा आहारात समावेश करा. फायबरमुळे पचनक्रिया सुरळीत राहते.

**प्रोबायोटिक्स:** दही, ताक, किमची यांसारखे प्रोबायोटिक युक्त पदार्थ खा, ज्यामुळे आतड्यांतील चांगले जीवाणू वाढण्यास मदत होते.

साधे आणि पौष्टिक अन्न: घरगुती, कमी तेलकट आणि कमी मसालेदार जेवण खाण्यावर लक्ष केंद्रित करा.

**पाणी:** शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यासाठी आणि पचन सुरळीत ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या. तुम्हाला पोटाच्या समस्यांचा त्रास होत असेल, तर वेळीच या ५ हानिकारक पदार्थांपासून दूर राहा आणि नैसर्गिक, पौष्टिक आहारावर लक्ष केंद्रित करा.

# मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमांतर्गत अमरावती मनपाकडून महापालिका संदेशिनी या माहितीपर पोर्टलची सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**
मा. मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमांतर्गत नागरिकांपर्यंत महापालिकेच्या कार्यवाही, निर्णय, योजना आणि उपक्रमांची माहिती पारदर्शकपणे पोहोचविण्यासाठी अमरावती महानगरपालिके तर्फे महापालिका संदेशिनी या अधिकृत न्यूज पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला.

या पोर्टलच्या माध्यमातून शहरातील स्वच्छता, पायाभूत सुविधा, पर्यावरण संरक्षण, नागरी सुविधा, विकासकामे, नागरिक सेवा आणि विविध सामाजिक उपक्रमांबाबतच्या बातम्या व अद्ययावत माहिती नागरिकांना एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.




महापालिका प्रशासनाने नागरिकांशी संवाद वाढविणे, पारदर्शक प्रशासन मजबूत करणे आणि नागरिकांना अधिक माहितीपूर्ण बनविणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

महापालिका संदेशिनी हे पोर्टल नागरिकांना शहरातील घडामोडी, निर्णय व उपक्रमांची अधिकृत व विश्वसनीय माहिती देणारे एक डिजिटल व्यासपीठ ठरणार आहे. अमरावती महानगरपालिकेच्या सर्व अधिकृत बातम्या, निवेदने आणि जनहिताची माहिती आता महापालिका संदेशिनी या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी वर्षानिमित्त केवडिया (गुजरात) येथे महाराष्ट्राचा चित्ररथ

## १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान केवडिया येथे होणाऱ्या महोत्सवात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१मुंबई–** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दीव्या) जयंती वर्षानिमित्त केंद्रीय गृह मंत्रालयामार्फत केवडिया, गुजरात येथे आयोजित करण्यात येणाऱ्याराष्ट्रीय संचलन कार्यक्रमात यंदा प्रथमच महाराष्ट्र राज्याचा चित्ररथ सहभागी होणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे या वर्षी स्वराज्य: एकतेचा धागा यासंकल्पनेवर हा चित्ररथ साकारण्यात आला आहे. या चित्ररथात अग्रभागी छत्रपती शिवाजी महाराजसिंहासनावर विराजमान असल्याचे दर्शन घडते. त्यांच्या मागे वारकरी संप्रदायातील वारकरी यांची मूर्तीतर पार्श्वभूमीवर मराठा आरमारातील प्रसिद्ध गुराब नौका दर्शविण्यात आली आहे. या माध्यमातूनराज्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि एकतेची झलक दर्शविण्यात आली आहे.या चित्ररथासोबत १४ कलाकारांचा चमू सांस्कृतिक सादरीकरण करणार असून, महाराष्ट्राच्याविविधतेतून एकतेचा संदेश देणारे हे सादरीकरण राष्ट्रीय स्तरावर राज्याची सांस्कृतिक ओळख अधोरेखितकरेल.तसेच, १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भारत पर्व अंतर्गत महाराष्ट्र व गोवा राज्यांच्यासांस्कृतिक कार्य विभागांद्वारे संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात येणार आहे. या महोत्सवाचामुख्य कार्यक्रम ७ -८ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडेल.महाराष्ट्र राज्याकडून या कार्यक्रमात राज्यातील समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्यासाठी गोंधळनृत्य, कोळी नृत्य, लावणी, तसेच वारी परंपरेवर आधारित सादरीकरणे यांचा समावेश असलेले सुमारे १५ते २० कलाकारांचे पथक सहभागी होणार आहे.या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांचीअसून यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन आहेया उपक्रमांद्वारे महाराष्ट्र राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरेचे वैभव राष्ट्रीय तसेचआंतरराज्यीय पातळीवर प्रभावीपणे सादर होणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# जारीदासह परिसरातील ५० गावांसाठी खात्रिशीर विजेची सोय

## आदीवासी बांधव आणि महावितरणकडून सरन्यायाधिश भुषण गवई यांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ अमरावती,**

महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा (चिखलदरा) उपकेंद्रामुळे मेळघाटातील दुर्गम भागाला खात्रिशीर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे. भारताचे मा. सरन्यायाधिश भुषण गवई यांनी केलेल्या विशेष प्रयत्नामुळे वनविभागाची परवानगी लवकरात लवकर मिळाली. जारीदा उपकेंद्र सुरू करण्यातील मुख्य अडथळा दुर होवून उपकेंद्र कार्यान्वित झाल्याने परिसरातील आदीवासी बांधव तसेच महावितरणचे अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भुषण गवई यांचे दारापूर (दर्यापूर तालुका) येथे आभार मानले.मेळघाटातील अतिदुर्गम व आदीवासी बहुल वन क्षेत्रामधील महावितरणच्या जारीदा वितरण



केंद्राअंतर्गत वीज पुरवठा होणाऱ्या ५० गावांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्याकरीता जिल्हा विकास निधीतील आदीवासी उपयोजनेअंतर्गत ९ कोटी ३३ लाख ९४ हजार खर्च करून जारीदा येथे नविन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात आले आहे.५ एमव्हीए क्षमता असलेल्या या उपकेंद्राला ३३ केव्ही वाहिनीव्दारे २२० केव्ही कोयलारी (मध्य प्रदेश) उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येणार आहे. उपकेंद्राचे काम ऑक्टोबर २०२३ ला पुर्ण झाले, परंतु ३३ केव्ही वाहिनीचा काही भाग वन विभागाच्या जमिनीमध्ये येत असल्यामुळे वन्य जीव संरक्षण कायदा (थडउ-) आणि वन संरक्षण कायदा (ऋउ-) अंतर्गत प्रस्ताव मंजूरीकरीता वन खात्याकडे पाठविण्यात आले होते.

मेळघाटातील दुर्गम अतीदुर्गम भागातील आदीवासी बहुल भागांना सुरळीत आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासंदर्भात महावितरण आणि जिल्हा प्रशासन कायम आग्रही राहीले असून त्यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यानंतर ३३ केव्ही जारीदा उपकेंद्राला या अगोदर राष्ट्रीय वन्य जीव बोर्डाच्या स्टँडींग कमीटीच्या दिल्ली येथील बैठकीत १२ मार्च २०२५ आणि पर्यावरण मंत्रालय सल्लागार समितीच्या दिल्ली येथील बैठकीत वन संरक्षण कायदा अंतर्गत १६ एप्रिल २०२५ ला ३३ केव्ही जारीदा उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली होती. यानंतर भारताचे मा. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भुषण गवई यांनी केलेल्या विशेष प्रयत्नामुळे वन्य जीव विभागाने दिनांक १४ जुलै २०२५ ला काम सुरू करण्याची मान्यता प्रदान केली असून पर्यावरण मंत्रालयाकडून दिनांक ६ ऑगष्ट २०२५ ला अंतीम मान्यता मिळाली.त्यामुळे महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा उपकेंद्र कार्यान्वित करण्यामधील मुख्य अडथळा दुर झाल्यानंतर उर्वरित कामे महावितरणकडून पुर्ण करून ३३ केव्ही जारीदा उपकेंद्र कार्यान्वित झाल्याने आदीवासी भागाला खात्रिशिर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे.

विशेष प्रयत्नामुळे वन्य जीव विभागाने दिनांक १४ जुलै २०२५ ला काम सुरू करण्याची मान्यता प्रदान केली असून पर्यावरण मंत्रालयाकडून दिनांक ६ ऑगष्ट २०२५ ला अंतीम मान्यता मिळाली. त्यामुळे महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा उपकेंद्र कार्यान्वित करण्यामधील मुख्य अडथळा दुर झाल्यानंतर उर्वरित कामे महावितरणकडून पुर्ण करून ३३ केव्ही जारीदा उपकेंद्र कार्यान्वित झाल्याने आदीवासी भागाला खात्रिशिर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे.

# सुंदर शाळा बनवा आणि लाखोंचे बक्षिसे जिंका !

## जिल्हात मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा उपक्रम सुरु होणार-शिक्षणाधिकारी मुगल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती–**

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभिनव अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. हे अभियान ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार असून, एकूण ७२ कोटी २२ लाख रुपयांची बक्षिसे राज्यातील विजेत्या शाळांना दिली जाणार आहेत.सन २०२५-२६ मध्ये हे स्पर्धात्मक अभियान काही नवीन उपक्रमांसह राबविले जाणार आहे. त्यानुसार, या तिसऱ्या टप्प्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या अभियानासाठी राज्यातील शाळांची विभागणी दोन गटांमध्ये करण्यात आली आहे. त्यामध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, इतर सर्व



व्यवस्थापनांच्या शाळा यांचा समावेश राहणार आहे.

प्रत्येक स्तरावर या दोन्ही गटांमधून स्वतंत्र विजेते निवडले जाणार असल्याची माहिती अमरावती जिल्हा परिषदचे प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांनी दिली आहे.

**मूल्यांकन व कालावधी–** या अभियानाचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणार आहे. त्यानंतर, १ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मूल्यांकनाची प्रक्रिया पार पडेल.

**पारितोषिके अशी असतील–** तालुका स्तरावर ३ लाख, २ लाख आणि १ लाख अशी तीन बक्षिसे राहतील. जिल्हा स्तरावर १० लाख, ७लाख आणि ३ लाख अशी पारितोषिके आहेत. हा तिसरा टप्पा शाळांमधील २ स्पर्धात्मक गुणवत्ता आणि सौंदर्यवर्धन या दोन्ही बाबींना गती देईल असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

**अभियान राबविण्याचे उद्दिष्ट –** शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा आणि सामाजिक बांधिलकीबाबत जागृती निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासास चालना देणे, हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# बिबट्याने केली काळविटाची शिकार

## एसआरपीएफ कॅम्पच्या मुख्य प्रवेशव्दारासमोरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

चांदूररेल्वे मार्गावर एसआरपीएफ कॅम्प पाचशे क्वॉर्टर परिसराच्या मुख्य प्रवेशव्दारसमोर बिबट्याने काळवीटची शिकार केली आणि शिकार केलेले काळविट जंगलात नेले. हे सर्व दृश्य काही नागरिकांनी मोबाईल कॅमेऱ्यामध्ये टिपले. ही घटना समोर आल्याने परिसरातील नागरिकांत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एसआरपीएफ कॅम्प परिसरात



सतत जवान गस्तीवर असतात. सकाळी व रात्रीलासुध्दा पूर्ण परिसरात गस्त असते. रात्रीला कॅम्प सुरक्षा पथक वडाळीपासून ते पाचशे क्वॉर्टरपर्यंत गस्त घालतात. तसेच आतील व बाहेरील भागातसुध्दा गस्त असते. २७ऑक्टोबरच्या रात्री २ ते २.३० च्या सुमारास सुरक्षा पथक वाहनाने गस्तीवर असताना पाचशे क्वॉर्टरसमोरील चांदूररेल्वेकडे जाणाऱ्या मार्गावर बिबट हा काळवीटची शिकार करताना दिसला. त्यांनी वाहन थांबविले. रस्ता दुभाजकाजवळून बिबट्याने ती शिकार तोंडात पकडून फरफटत जंगलात नेली. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर परिसरातील नागरिकांत चांगलीच दहशत निर्माण झाली.एसआरपीएफ कॅम्प परिसरात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून बिबट रात्रीला पाचशे क्वॉर्टर परिसरालगत फिरताना दिसतात. त्यामुळे मोठी अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# २० हजारांची लाच मागणाऱ्या पोलीस अंमलदारास अटक

**भातकुली ठाण्यातील घटना, दोन महिन्यानंतर कारवाई**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ भातकुली**

गुन्ह्याच्या तपासात मदत करण्याकरिता व केस डायरी सोयीची करून देण्याकरिता २० हजार रुपये लाचेची मागणी करणाऱ्या पोलीस अंमलदाराला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि.३०) सायंकाळी अटक केली. अब्दुल रहीम अब्दुल कदीर (वय ५४, रा. जाकीर कॉलनी) असे पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

तक्रारदाराविरुध्द भातकुली पोलीस ठाण्यात गुन्ह्यात दाखल आहे. याप्रकरणात तक्रारदाराने न्यायालयातून अटकपूर्व जामिन मिळविला होता. त्यामुळे तपास अधिकाऱ्यांनी तक्रारदाराच्या भावाला अटक केली होती.त्यानंतर तपास अधिकाऱ्याने तक्रादाराला तपासात मदत करण्याकरिता व केस डायरी सोयीची करून देण्याकरिता ५० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदाराने २० हजार रुपये देण्यास कबुल केले. तसेच तपास अधिकाऱ्याला १० हजार



रुपये दिले होते. उर्वरित रक्कम तक्रादाराला द्यायची नव्हती. त्यामुळे त्याने ११ ऑगस्ट २०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. लाचलुचपतप्रतिबंधक विभागाने प्रथम पडताळणी केली. त्यानंतर गुरुवारी पोलीस अंमलदार अब्दुल रहीम अब्दुल कदीर याने तक्रारदाराला गुन्ह्यात मदत करण्याकरिता २० हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होताच त्याला अटक केली. याकारवाईत पोलीस निरीक्षक प्रवीण वेरूळकर, पोलीस अंमलदार डिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, किशोर पवार, गोपाल किरडे आणि सलीम खान यांचा समावेश होता.

# अंजनगावात घरफोडी करणारी चौकडी पकडली

**५ गुन्हे उघड: पोलिसांनी ४ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अंजनगावसुर्जी–** मागील काही दिवसांपासून अंजनगाव सुर्जी शहरात आणि परिसरात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान अंजनगाव पोलिसांनी चार अट्टल चोरट्यांना पकडून पाच घरफोड्यांचा उलगडा केला आहे. या वेळी पोलिसांनी त्यांच्याकडून ४ लाख ८९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे जुबेरोद्दीन कलिमोद्दीन (२२, उस्मानपुरा) आणि नुरोद्दीन उर्फ मुक्का नजमोद्दीन (२४, काजीपुरा, अंजनगाव सुर्जी) यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी या घरफोडीत सहभागी असल्याचे सांगितले. या वेळी चार चोरट्यांकडून पोलिसांनी टीव्ही, सोन्याची पोत, अंगठी, पैंजण, पैंजणाचे तुकडे, कडे तसेच दोन



मोबाइल तसेच चोरीच्या गुन्ह्यात वापरलेली बुलेट मोटरसायकल आणि सुमारे ५७ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी अंजनगाव पोलिसांनी संतोष भाऊराव शिंदे (३६, मूर्तिजापूर, जि. अकोला) आणि अ. अतिक अ. रफिक (अमरावती) या दोघांना अटक केली होती. त्यांची पोलिस कोठडीही घेतली होती. या दोघांनी अंजनगाव सुर्जी आणि परिसरातील घरफोड्यांमध्ये सहभाग असल्याचे कबूल केले आहे. ही कारवाई अंजनगावचे ठाणेदार सूरज बोंडे, यांच्या मार्गदर्शनात सपोनि सूरज तेलगोटे, जयसिंग चव्हाण, रवी राठोड, मोहसीन पठाण, शुभम मार्कंड, आकाश रंगारी, अमित घाटे, अंकुश सयाम, विशाल थोरात, प्रमोद चव्हाण, दीपाली तेलगोटे यांनी केली आहे.

# ड्युटीवर मद्यसेवन करणाऱ्यांना आता माफी नाही...

## राज्यात ७ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१मुंबई–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) ड्युटीवर मद्यसेवन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आता कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार २८ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यव्यापी अचानक तपासणी मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेत चालक, कंडक्टर आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची मद्यसेवन तपासणी करण्यात आली, ज्यात एकूण १७०१ कर्मचाऱ्यांची चौकशी झाली. तपासणीत ड्युटीवर मद्यसेवन करताना सात कर्मचाऱ्यांना दोषी ठरवण्यात आले. यामध्ये एक चालक, चार तांत्रिक कर्मचारी, एक सफाई कामगार आणि एक कंडक्टर यांचा समावेश आहे. विभागनिहाय तपशील पाहता, धुळे जिल्ह्यात एक चालक, एक तांत्रिक कर्मचारी आणि एक सफाई कामगार दोषी ठरले. नाशिकमध्ये एक चालक, परभणी आणि भंडारा येथे प्रत्येकी एक तांत्रिक कर्मचारी दोषी ठरले, तर नांदेडमध्ये एक कंडक्टर दोषी ठरला. या सर्वांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून पुढील शिस्तभंग कार्यवाही सुरू आहे.



परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, एसटीमध्ये मद्यपी कर्मचाऱ्यांना कुठलाही आश्रय मिळणार नाही. प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्यांवर दया दाखवली जाणार नाही. यासह, सुरक्षा विभागाला नियमित आणि अनपेक्षित तपासण्या चालू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.भविष्यात, नवीन बस वाहनांमध्ये चालकाच्या सीटजवळ ब्रेथ नलायझर यंत्र बसवण्याची योजना आहे, ज्यामुळे मद्यसेवन करणाऱ्यांवर त्वरित प्रतिबंध केला जाईल आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाईल. मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी ही जनवाहिनी असल्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता हा प्रथम प्राधान्याचा मुद्दा आहे. ही कारवाई सार्वजनिक वाहतुकीत अनुशासन सुधारेल आणि गैरवर्तनाला आळा बसेल.या मोहिमेचे जनतेकडून कौतुक होत असून, त्यामुळे एसटीची सेवा अधिक विश्वासार्ह आणि सुरक्षित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नुकसान भरपाईसाठी अमरावती जिल्ह्याला १११७ कोटींचा मदतनिधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ अमरावती,**

सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील झालेल्या शेतीच्या नुकसानीपोटी ५७० कोटी आणि शासनाने मदतीचा निकष दोन हेक्टरवरून तीन हेक्टर मर्यादा वाढ केल्यामुळे ५४७ कोटी रूपयांचा निधी देण्याचा निर्णय आज घेण्यात आला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यात केवळ अमरावती जिल्ह्याला हा निधी प्राप्त झाला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दोन स्वतंत्र शासकीय निर्णय जाहीर झाले आहे.अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी हा निधी वितरित करण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ४ लाख ८१



हजार ५०३ हेक्टर जमीन बाधीत झाली होती. यासाठी ४९० कोटी रूपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच दोन हेक्टरवरून तीन हेक्टर मर्यादा वाढ केल्यामुळे ५५ हजार २१२ शेतकऱ्यांना ६६ हजार ३७३ हेक्टरसाठी ७९ कोटी रूपयांचा निधी प्राप्त होईल. राज्यातील विविध जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी, पूर यामुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांसाठी दोन स्वतंत्र शासकीय निर्णय जाहीर झाले आहे.अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी हा निधी वितरित करण्यात येत आहे.

अमरावती जिल्ह्यातील ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ४ लाख ८१ हजार ५०३ हेक्टर जमीन बाधीत झाली होती. शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता विशेष मदत देण्यात येणार आहे. यात सप्टेंबर २०२५ मधील कालावधीमध्ये ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ५ लाख ४७ हजार८७६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासाठी जिल्ह्याला ५४७ कोटी रूपयांची मदत मिळणार आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामामध्ये १० हजार रूपये प्रति हेक्टरी मदत, अर्थसहाय देण्याचा निर्णय १० ऑक्टोबर रोजी घेण्यात आला आहे. ही मदत ३ हेक्टरपर्यंतच्या मर्यादेत करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी तातडीने प्रस्ताव सादर केले. त्यानुसार आज जाहिर झालेल्या दोन शासन निर्णयामध्ये नुकसानीपोटी जाहिर झालेली मदत आणि रब्बी हंगामाकरीता देण्यात येणारी विशेष मदतमध्ये राज्यातून एकमात्र अमरावती जिल्ह्याला मदत जाहिर झाली आहे.

# ‘पोस्टवुमन’ ही नोकरी सांभाळून रसिका मुळे यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

आजही आपल्या समाजात महिलांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. पण, तरीही काही तरूणी आहेत, ज्या अडचणींवर मात करून एक आदर्श निर्माण करतात. अशीच एक प्रेरणादायी कहाणी रसिका मुळे हिची आहे. रसिका हिने तब्बल तीन वर्षे ’पोस्टवुमन’ ही नोकरी सांभाळून यूपीएससीची परीक्षा दिली. चौथ्या प्रयत्नात तिने यशाला गवसणी घातली. नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०२४ ची राखीव यादी नुकतीच जाहीर करण्यात आली. त्यात रसिका हिला स्थान मिळाले आहे. बारावीच्या परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहुमान रसिका मुळे हिला मिळालेला. त्यावेळी रसिका हिने आयएएस होऊन देशाची सेवा करावी, ही इच्छा रसिकाच्या वडिलांनी बोलून दाखवली होती. तिला तोवर आयएएस किंवा यूपीएससी परीक्षेविषयी काहीच माहिती नव्हती. पण, तिने मनोमनी आयएएस होण्याचे ठरवले. रसिका हिने येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून संगणक शास्त्र अभ्यासक्रमाचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर यूपीएससी परीक्षेची तयारी करण्याचे ठरवले. त्यानंतर ’कॅम्पस’ मधूनच टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीत तिला नोकरी मिळाली. एकीकडे आपले स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द आणि दुसरीकडे घरी मदत करण्याचीही इच्छा यातून तिने नोकरी करतानाच यूपीएससी परीक्षा देण्याचे ठरवले. पण, पहिल्या प्रयत्नात तिला यश मिळू शकले नाही. नंतर तिथे ’टीसीएस’ची नोकरी सोडून घरी राहून अभ्यास केला. पण, दुसऱ्या प्रयत्नातही यशाने हुलकावणी दिली. नंतर तिने मेझॉन कंपनीत नोकरी पत्करली. एक वर्ष तिने कामही केले. पण, यूपीएससी परीक्षा महत्वाची वाटत होती. नंतर तिला टपाल खात्यात ’पोस्टवुमन’ म्हणून नोकरी मिळाली. तिने तीन वर्षे या सेवेत




राहून अभ्यासही केला आणि परीक्षाही दिली. २०२४ च्यापरीक्षेचा निकाल जाहीर झाला. तेव्हा पहिल्या यादीत तिचे नाव नव्हते, पण आता अंतिम निवड यादीत तिला स्थान मिळाले आहे. युनिक अकॅडमी अमरावती येथे प्रा. अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तिने युपीएससी ची तयारी केली. वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर खचून न जाता जिद्दीने तिने यूपीएससीची तयारी पूर्ण केली.रसिका मुळे हिचे दहावी ते पदवीपर्यंतचे शिक्षण अमरावतीतच झालेले. दहावीत तिला ९८.१८ टक्के, तर बारावीत ९६ टक्के गुण मिळाले होते. ’पोस्टवूमन’ म्हणून नोकरी करताना यूपीएससीची तयारी करणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक काम होते. तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची झिरी मंदिराला भेट घेतले समाधीचे दर्शन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.३१अमरावती**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व वर्तमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अमरावती दौऱ्यादरम्यान गुरूवारी (ता. ३०) श्री दत्त मंदिर झिरी येथे भगवान दत्तात्रय गुरूंचे व ब्रह्मचारी योगीवर श्री सीताराम महाराज टेम्ब्ये स्वामी यांच्या समाधीचे दर्शन घेतले.भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी आणि झिरी संस्थानचे अध्यक्ष चंद्रशेखर कुळकर्णी यांनी मंदिरात एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले. उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी मंदिराचा इतिहास जाणून घेतला.

# जिल्हापरिषद वऱ्हा सर्कल मधून राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) कडून हेमंत बोबडे यांची उमेदवारी जवळपास निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१तिवसा** तिवसा तालुक्यातील ओळखलेले सर्वसमावेशक आणि जनसंपर्कशील नेते हेमंत सुरेशराव बोबडे यांची वऱ्हा जिल्हा परिषद मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) कडून उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार सुरू आहे.हेमंत बोबडे यांनी मागील १५ ते २० वर्षांपासून पक्षनिष्ठेने राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार गटासाठी कार्य केले असून, त्यांनी पक्षातील विविध जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या सांभाळल्या आहेत. गुरुदेव नगर शहराध्यक्ष, वऱ्हा जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष, तालुका युवक अध्यक्ष, तसेच सध्या तालुका अध्यक्ष ग्रामीण तिवसा या पदांवर कार्यरत राहून त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे.शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या तसेच सर्वसामान्य जनतेच्या समस्यांवर त्यांनी नेहमीच पुढाकार घेत शासनाकडे ठोस निवेदने सादर केली आहेत. शेतकऱ्यांच्या



उत्पादनाला योग्य दर मिळावा, रोजगार निर्मिती वाढावी, गोरगरीबांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या मागण्यांसाठी त्यांनी सतत प्रशासनाला वेठीस धरले आहे.हेमंत बोबडे यांच्या कार्यपद्धतीत जात-पात, धर्म, श्रीमंती-दारिद्र्य यांचा कधीही भेदभाव राहिला नाही. समाजातील सर्व घटकांशी सुसंवाद ठेवत त्यांनी गोरगरीब व वंचित वर्गाच्या हितासाठी नेहमी झटणारा एक कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण केली आहे.स्थानिक पातळीवरील अनेक सामाजिक व लोकहिताच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून, नेहमी जनतेच्या पाठीशी असणारा आणि जनतेसाठी लढणारा चेहरा म्हणून ते तिवसा तालुक्यात तसेच वऱ्हा जिल्ह्यात विशेष प्रसिद्ध आहेत.आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून त्यांची अधिकृत घोषणा लवकरच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ८८ वर्षानंतर अनु. जमातीच्या व्यक्तीला संधी

## वरूडचा नगराध्यक्षपदाचा इतिहास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१वरुड-** या ८८ वर्षाच्या कालावधीत सहा महिलांनी नगराध्यक्षपद भूषविले. सर्वाधिक सत्ता काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांची राहिली. काही पंचवार्षिक योजना शिवसेना व भाजपच्या वाट्याला आल्या. डिसेंबर २०२१ पासून प्रशासक राज असल्याने तब्बल पाच वर्षानंतर सार्वत्रिक निवडणुका होणार असून स्वातंत्र्यानंतर तब्बल ८८ वर्षानंतर नगराध्यक्षपद अनुसूचित जमातीच्या वाट्याला आले आहे. त्याकरिता राजकीय पक्षांकडून नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची शोध मोहीम सुरू झाली आहे. नगराध्यक्ष पद अनुसूचित जमातीकरिता राखीव आल्याने अनेकांचे स्वप्न अधुरे राहिले. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप, शरद पवार राष्ट्रवादी, राष्ट्रीय काँग्रेस या पक्षांच्या उमेदवारांची थेट लढत होणार असल्याचे बोलल्या जात आहे.या निवडणुकीत नवख्या आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळण्याची संभावना वर्तवली जात आहे. अनेक



महिलांना उमेदवारी देऊन त्यांचे राजकीय वर्चस्व टिकविण्याची संधी मिळाली आहे. २०१६ मध्ये बहुमताने भाजपच्या स्वाती आंडे या महिला नागरिकाचा मागास प्रवर्ग आरक्षणातून नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या होत्या. परंतु यावेळी १३ प्रभाग २६ सदस्य असलेल्या वरूड नगर परिषदेत थेट नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होत असून रिंगणात भाजप, आघाडी व अजित पवार राष्ट्रवादीच्या उमेदवारात थेट समोरासमोर लढत होणार आहे. अजित पवार तसेच शिवसेना शिंदे गट तसेच इतर आघाड्या या पक्षांमध्ये युती होण्याची संभावना आहे. या निवडणुकीत चांगलीच चुरस रंगणार आहे. त्या पृष्ठभूमीवर राजकीय पक्षात वातावरण तापायला सुरुवात झाली आहे.

# भारताच्या रणरागिणींचा ऐतिहासिक विजय!

## ऑस्ट्रेलियाची नांगी ठेचून फायनलमध्ये धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई -** ३३९ धावांचे तगडे आव्हान, समोर ऑस्ट्रेलियासारखा ७ वेळा विश्वचषक जिंकणारा तगडा प्रतिस्पर्धी, भरीत भर म्हणून प्रतीका रावलसारखी बहरातील फलंदाजही जायबंदी होऊन स्पर्धेबाहेर फेकली गेलेली. पण, या साऱ्या प्रतिकूल परिस्थितीतही जिंकली ती भारतीय रणरागिणींचा दुर्दम्य आशावाद! जेमिमा रॉड्रिग्यूजचे खणखणीत शतक, तिने हरमनप्रीतसह केलेली १६७ धावांची अविश्वसनीय भागीदारी निर्णायक ठरली आणि याच बळावर भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाला चारीमुंड्या चीत करत भारताने आयसीसी महिला वन डे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली! विजयासाठी ३३९ धावांचे तगडे आव्हान असताना शेफाली वर्मा अवघ्या १० धावांवर तंबूत परतल्याने भारताला प्रारंभीच पहिला धक्का बसला. सहकारी सलामीवीर स्मृती मानधना देखील २४ धावांवर बाद झाल्यानंतर भारताची २ बाद ५९ अशी स्थिती होती. मात्र, याचवेळी जेमिमा रॉड्रिग्यूज १३४ चेंडूत १४ चौकारांसह १२७ व हरमनप्रीत कौर ८८ चेंडूत १० चौकार, २ षटकारांसह ८९ यांची जोडी क्रीझवर जमली आणि या उभयतांनी तिसऱ्या गड्यासाठी १६७ धावांची धडाकेबाज खेळी साकारत ऑस्ट्रेलियन संघाच्या पायाखालची अक्षरशः वाळू सरकवली.

डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात ’कांगारू’ संघाने प्रथम फलंदाजी करताना सर्व गडी गमावून ३३८ धावांचा डोंगर उभा केला, ज्यात फीबी लिचफील्डने (११९) नेत्रदीपक शतक झळकावले. प्रत्युत्तरात, भारतीय संघाने जेमिमा रॉड्रिगजच्या (१२७*) शानदार शतकाच्या जोरावर हे मोठे लक्ष्य सहज गाठले.




### असा रंगला चित्तथरारक मुकाबला

एलिसा हिली (५) लवकर बाद झाल्यानंतर लिचफील्ड (११९) आणि एलिस पेरी (७७) यांनी ऑस्ट्रेलियन डावाला आकार दिला. मधल्या फळीत श्ले गार्डनरने ४५ चेंडूंमध्ये ६३ धावांची झंझावाती खेळी करत संघाला ३०० धावांच्या पार पोहोचवले. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली नाही. शेफाली वर्मा (१०) आणि स्मृती मानधना (२४) हे सलामीचे फलंदाज लवकर बाद झाले. त्यानंतर, रॉड्रिग्ज आणि कर्णधार हरमनप्रीत कौर (८९) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. अखेरीस, दीप्ती शर्मा (२६) आणि रिचा घोष (२६) यांनी महत्त्वपूर्ण योगदान देत भारताला विजय मिळवून दिला.

# साजिद बेग व अन्वर यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ यवतमाळ**

आर्णी, तालुक्यातील राजकीय वर्तुळात मोठी घडामोड घडली असून, काँग्रेसचे आर्णी येथील दिग्गज साजिद बेग आणि माजी नगर परिषद सभापती अन्वर पठाण, शेखर खंदार, संजय व्यवहारे, युनुस शेख आपल्या असंख्य समर्थकांसह अप राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.मुंबईत राष्ट्रवादी भवन येथे उपमुख्यमंत्री तथा पक्षाध्यक्ष अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.साजिद बेग आणि अन्वर पठाण यांच्या प्रवेशामुळे आर्णी तालुक्यात अप राकाँला मोठे बळ मिळाले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या




पार्श्वभूमीवर हा प्रवेश अत्यंत महत्वाचा मानला जात आहे.यावेळी बोलताना पक्ष नेतृत्वाने स्पष्ट केले की, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका आणि नगर पंचायत निवडणुका अप राकाँ स्वबळावर लढणार आहे. पक्षात नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांसह, सर्व इच्छुक कार्यकर्त्यांना उमेदवारीची संधी दिली जाईल. , असे आश्वासनही देण्यात आले आहे.या पक्षप्रवेशामुळे आर्णी शहर व तालुक्यात अप राकाँचा प्रभाव निश्चितपणे वाढणार आहे. लवकरच पक्षाच्या नवीन शाखा उघडून संघटन अधिक मजबूत केले जाणार आहे.

या प्रवेश सोहळ्यासाठी यवतमाळ जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर, आर्णी तालुकाध्यक्ष सुनील पोतगंटवार यांच्यासह तालुक्यातील राकाँचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित होते.

### आर्णीला विकासाच्या वाटेवर नेऊ

आर्णी शहर व तालुक्यातील जनतेला न्याय देण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील. आगामी नगर परिषद निवडणुकीत अप राष्ट्रवादी काँग्रेसला पूर्ण बहुमत मिळाल्यास, आर्णी शहराला विकासाच्या नव्या वाटेवर नेऊ, असा विश्वास साजिद बेग यांनी यावेळी व्यक्त केला.

# अमरावती शहरात ६० तर बडनेरात ७३ मिमी पावसाची नोंद, अवकाळीचा कहर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती-** यंदा जुलै महिन्यांपासून जिल्ह्यात पावसाने कहर सुरू केला आहे. अतिपावसामुळे जिल्ह्यातील सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र अजूनही पावसाचा कहर काही थांबला नाही.बुधवारी मध्यरात्री ते गुरुवारी पहाटेपर्यंत शहरासह परिसरातील बडनेरासह जिल्ह्यात सर्वदूर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली



आहे. अमरावतीत ६० तर बडनेरात ७३ मिमी पावसासह अतिवृष्टीची नोंदझाली आहे. या अवकाळी पावसामुळे शेतात असलेल्या कपाशीलाही आता फटका बसण्याची शक्यता आहे. सध्या अरबी समुद्रावर मोथा वादळामुळे कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यातच अवकाळीने हजेरी लावली आहे. दरम्यान बुधवारी मध्यरात्री दीड वाजतापासून शहर व जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली. या वेळी काही भागात सलग एक ते दोन तास जोरदार पाऊस सुरू होता. त्यामुळे बडनेरा व मंगरूळ चव्हाळा या दोन महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.-

# अचलपूर रुग्णालयात स्त्री रुग्ण ताटकळत

## ओपीडी चार तास विलंबाने उघडली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अचलपूर-**

अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात अचलपूर तालुक्या सह मेळघाट, अंजनगाव, दर्यापूर व चांदूरबाजार तसेच आदी ग्रामीण भागातील गर्भवती महिलांची उपचारासाठी प्रचंड गर्दी असते. गुरुवारी सकाळी ८ वाजता सुरू होणारी ओपीडी दुपारी १२ वाजूनही सुरू न झाल्याने एकच गोंधळ उडाला होता. सदर प्रकार नेहमी होत असल्याचा रुग्णांचा आरोप आहे.

प्राप्त माहितीनुसार, गुरूवार, ३० ऑक्टोबरला अचलपूर येथील स्त्री व बाल रुग्णालयात विषेश ओपीडी आयोजित करण्यात आली होती. गुरुवारी ग्रामीण भागासह चांदुर बाजार, अंजनगाव व मेळघाटातील गरोदर महिलांना तपासणीसाठी बोलावण्यात आले होते. स्त्री रोग तज्ञ डॉक्टरकडून तपासणी केली जाणे अपेक्षित असतांना दीडशे ते दोनशे गरोदर महिला



तपासणीसाठी आल्या असताना संबंधित डॉक्टर उपस्थित नसल्याने व तीन ते चार तासाचा अवधी उलटल्यानंतरही तपासणी सुरू न झाल्याने काही रुग्णांच्या नातेवाईकांनी फोटो आणि व्हिडीओ काढून आमदाराकडे पाठविले, तसेच सोशल मीडियावर टाकले. त्यावेळी रुग्णालयातील कर्मचार्यांनी मनाई करीत तंबी दिली. गोधळ वाढत असल्याचे पाहून एका डॉक्टरांकडून त्या गरोदर महिलांची तपासणी सुरू करण्यात आली; पण यावेळी स्त्री रोग तज्ञ डॉक्टर अनुपस्थित होते. येथे गरोदर महिलांची विशेष तपासणी दर गुरुवारी केली जाते. मात्र, डॉक्टरांची अनुपस्थिती का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. श्रेणीवर्धन होऊन येथे जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय निर्माण होत असल्याने याचा फायदा मतदारसंघासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना होणार, अशी आशा होती; पण आजच्या या प्रकरामुळे प्रश्न निर्माण झाला आहे . याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे .

# ओला इलेक्ट्रिक दुचाकी ग्राहकांचे वाढते संतापाचे वारे

## ३ नोव्हेंबरला अमरावतीत शो रूम ला ताला ठोको आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**


अमरावती जिल्ह्यातील ओला इलेक्ट्रिक दुचाकी ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून कंपनीच्या विक्रीपश्चात सेवेमधील उणिवांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी होत आहेत. ओला इलेक्ट्रिक ही नावाजलेली इलेक्ट्रिक दुचाकी कंपनी असली तरी अमरावतीतील त्यांच्या सर्व्हिस सेंटरमध्ये तांत्रिक अडचणी, कुशल कर्मचाऱ्यांचा अभाव आणि स्पेअर पार्ट्स न मिळाल्यामुळे ग्राहकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, अमरावतीतील वर्कशॉपमध्ये सुमारे २०० ते २५० गाड्या गेल्या अनेक महिन्यांपासून दुरुस्तीअभावी उभ्या आहेत. कंपनीकडून ग्राहकांच्या तक्रारींवर कोणतीही ठोस कारवाई केली जात नसून, टोल-फ्री क्रमांक सतत बिझी दाखवतो आणि ग्राहकांना कोणताही प्रतिसाद मिळत नाही.या समस्यांविषयी ग्राहकांनी आरटीओ आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली असली तरी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. कंपनीचे कर्मचारी आणि एरिया सर्व्हिस मॅनेजर श्री. उज्वल चौरमाडे यांच्याकडूनही कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील ओला इलेक्ट्रिक दुचाकी ग्राहकांनी येत्या ३ नोव्हेंबर २०२५ रोजी नवाथे चौक येथील ओला शोरूमसमोर तालाठोक आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांना आपल्या अडचणी मांडण्यासाठी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# आपत्तीचा फटका सोयाबीन शेतकऱ्यांना चांगल्या दाण्यांना ४ हजार, इतरांना नकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अचलपूर**



चांदुर बाजार तालुक्यातसप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले. पावसामुळे काळवंडलेल्या सोयाबीनचा उताराही एकरी दोन ते तीन क्विंटल येत असून त्याला बाजारपेठात भावही मिळत नसल्याने सोयाबीन काढण्याचीही खर्चही निघणे अवघड झाले आहे. तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त झाला असल्याचे दिसून येत आहे.

मागील वर्षी प्रारंभी सोयाबीनचे भाव पाच हजार रुपयावर गेले होते. त्यानंतर मात्र भाव गडगडले. चांगले सोयाबीन साडेतीन तीन ते चार हजार रूपये क्विंटलने भावाने विकावे लागले. यावर्षीही सोयाबीन कापणीच्या वेळेतच सतत पाऊस झाला. त्यामुळे सोयाबीनला मोड आले होते, तसेच सोयाबीन काळे पडले असल्याने तालुक्यातील शेतकरी हतबल झाले आहे.आता शेतकरी सोयाबीन विक्रीसाठी बाजारात आणत असून व्यापारी सोयाबीनची कमी भावात खरेदी करीत असून आजघडीला बाजारपेठ सोयाबीनला ३ हजार ते तीन हजार तीनशे रुपये क्विंटलने विक्री होत आहे. दुसरीकडे मजुरांनी सोयाबीनची एक बॅग काढण्यासाठी ४ हजार ५०० रुपये घेतले, तर सोयाबीनच्या उतारा पाहिजे तसा येत नसल्याने एका बॅग सोयाबीन काढणीला १५०० रुपये मळणीयंत्रातून सोयाबीन काढणीसळी लागत आहेत. एकरी सोयाबीन काढणीसाठी ६ हजार रुपये खर्च येत आहे.

**हमीभाव केंद्र कधी सुरू होणार ?**

चांदूरबाजार तालुक्यासह सर्वच महसूल मंडळ परिसरातील शेतकऱ्यांना मागील दहा ते पंधरा दिवसांपासून सोयाबीनची काढणी करून बाजारपेठेत विक्रीसाठी आणत आहे; परंतु सोयाबीनला भाव मिळत नसल्यामुळे कमी भावात सोयाबीन विक्री करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. सरकारने सोयाबीन खरेदी करण्यासाठी शासनाचे हमीभाव केंद्र सुरू करावी, तसेच नैसर्गिक आपत्तीत काळवंडलेली सोयाबीनलासुद्धा योग्य भाव मिळावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांमधून होत आहे.

# श्री संत आडकुजी महाराजांच्या १०४ व्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र वरखेड येथे आरोग्य तपासणी शिबिर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१तिवसा**

श्री संत परमहंस सदगुरु आडकुजी महाराज यांच्या १०४ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री आडकुजी महाराज देवस्थान, श्रीक्षेत्र वरखेड येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर उपजिल्हा रुग्णालय तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. गावातील नागरिक, भाविक तसेच उपस्थित मान्यवरांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.या आरोग्य तपासणी शिबिरात एकूण ७८ नागरिकांची तपासणी करण्यात आली. नागरिकांच्या रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, इत्यादी नियमित आरोग्य तपासण्या तसेच आवश्यक औषधोपचार सल्ला देण्यात आला. महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र सल्ला विभागही या ठिकाणी कार्यरत होता.देवस्थानतर्फे दरवर्षी पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात येते. त्याच परंपरेचा भाग म्हणून या वर्षी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय तिवसा येथील समस्त आरोग्य टीमने उत्स्फूर्त सहकार्य केले. त्यामध्ये खालील मान्यवरांचा विशेष सहभागहोतादेवस्थान व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी या आरोग्य उपक्रमाबद्दल उपजिल्हा रुग्णालयाच्या सर्व वैद्यकीय टीमचे मनःपूर्वक आभार मानले.श्री आडकुजी महाराज देवस्थानच्या वतीने सात दिवसांच्या कालावधीत विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवले जात असून, संतांच्या सेवाभावाची परंपरा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून कायम राखली जात आहे.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय तिवसा येथील समस्त आरोग्य टीमने उत्स्फूर्त सहकार्य केले.डॉ. जयेश शेखार,डॉ. विकास जायभायेऔषधी निर्माता गणेश भोणेएचआयव्ही समूहदेशक अफसर पठाणसिस्टर शितल बेर्डे, पूजा गडलिंगमहालॅब तर्फे: विनोद बोराळकर, लखन देऊळकरअटेंडन्स: शुभम शिंदे, बंडू कदमत्यामध्ये वरील मान्यवरांचा विशेष सहभाग होता.

# दर्यापूर पंचायत समिती अंतर्गत विविध योजनांचा फायदा घ्यावा - आ गजानन लवटे

## भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम तर्फे वाटण्यात आले विविध साहित्य



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१दर्यापूर**

दर्यापूर पंचायत समिती, भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), जिल्हा प्रशासन अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग यांच्या राष्ट्रीय वयोश्री योजना अंतर्गत वरिष्ठ नागरिकांना सहाय्यक उपकरणे वितरण शिबिर आयोजित करण्यात आले.या शिबिरास (दर्यापूर विधानसभा क्षेत्राचे) कर्तव्यदक्ष आमदार मा.श्री. गजाननभाऊ लवटे यांनी उपस्थित राहून वरिष्ठ नागरिकांना कृत्रिम अंग व सहाय्यक उपकरणे वाटप केले, या प्रसंगी आमदार गजाननभाऊ लवटे यांनी उपस्थित नागरिकांना कृत्रिम अंग व सहाय्यक उपकरणांच्या उपयोगाबद्दल मार्गदर्शन केले.भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), जिल्हा प्रशासन आणि पंचायत समिती यांच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित केले आहे. या योजनेमुळे जे नागरिक चालण्यात, ऐकण्यात किंवा इतर शारीरिक अडचणींमुळे त्रस्त आहेत, त्यांना मोठा आधार मिळणार आहे.आपण सर्वांनी या योजनांचा लाभ घ्यावा, आपल्या ओळखीतील ज्येष्ठ नागरिकांनाही याबद्दल माहिती द्यावी, जेणेकरून कुणीही या सुविधांपासून वंचित राहणार नाहीशेवटी एवढेच सांगू इच्छितो -

ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजाचे अभिमान आहेत, आणि त्यांची सेवा करणे हेच आपले कर्तव्य आहे, आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण दर्यापूर विधानसभा क्षेत्र अधिक प्रगत आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवू या.यावेळी उपस्थित मा. ढवक साहेब (गटविकास अधिकारी पंचायत समिती दर्यापूर), मा. घुगे साहेब (गटशिक्षणाधिकारी दर्यापूर), मा. महेंद्रभाऊ दिपटे (शिवसेना, उपजिल्हाप्रमुख अमरावती), मा. अंकुश पाटील कावडकर (युवासेना जिल्हा प्रमुख अमरावती), मा. प्रदीपभाऊ वडतकर (जिल्हा समन्व्यक अमरावती), मा. बबनराव विल्हेकर (विधानसभा संघटक दर्यापूर), मा. गुणवंत पाटील गावंडे (तालुका संघटक, दर्यापूर), मा. दिपकभाऊ बगाडे (शिवसेना उपशहरप्रमुख, दर्यापूर), व तसेच (शिवसेना - युवासेना) आजी - माजी पदाधिकारी व दर्यापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील वरिष्ठ नागरिक व अधिकारी उपस्थित होते.

# रविवारी श्री गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

श्री गजानन महाराज विश्वस्त मंडळ व आदिशक्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गजानन महाराज विजयग्रंथ पारायण सोहळा व 'श्री'च्या पादुकांचे दर्शन सोहळा रविवार २ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.



हा सोहळा श्री गजानन मंदिर प्रांगण, श्री कॉलनी, कमलप्लाझा जवळ, दस्तूरनगर अमरावती येथे सकाळपासून दिवसभर भक्तिभावाने साजरा होणार आहे.

रविवारी सकाळी ६.४५ ते ७.३० या वेळेत 'श्रीं'च्या पादुकांचा अभिषेक, त्यानंतर ७.४५ ते दुपारी ४ या वेळेत श्री गजानन विजयग्रंथ पारायण वाचन होईल. दुपारी ४ ते ४.३० या वेळेत 'श्री'ची महाआरती व ४.३० वाजता प्रसाद वितरण होईल. या सोहळ्याचे मुख्य ग्रंथवाचक ठाणे मुंबई येथील विद्या पडवळ यांच्या सुमधुर वाणीतून पारायण वाचन होणार आहे.माजी खा. नवनीत राणा व आ. रवी राणा या कार्यक्रमाला उपस्थित राहून श्री गजानन महाराजांविषयी भक्तिभाव,श्रद्धा आणि समाजसेवेचा संदेश देणार आहेत. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रदीप देशमुख, दीपक पाटील, सुनील राणा, मिलिंद काहाळे, प्रमोद कराळे, राजकुमार राठोड, शिरिष देशमुख, जितेन्द्र ऐडले, संजय कोंगले, हेमंत ठाकरे, मृणाल मुकुंदकर, गिरीश सोळंके, प्रवीण मुळावकर आणि अमित बेदरकर, यांच्यासह आदिशक्ती महिला मंडळाच्या प्रमुख पूजा बोरेकर यांच्या नेतृत्वाखाली महिला मंडळाने विशेष उत्साहाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मंडळातील कविता राजुरकर, उज्ज्वला जोशी, सौ रोहिणी केदार, सौ पन्द्मा देशमुख, सौ. उज्ज्वला अडसड, संगीता केने, प्रीती गडमडे, प्रणिता कुलकर्णी, वंदना मालधुरे, मधुरा काहाळे, कांचन वर्मा, प्रांजली बेदरकर, अपर्णा मुळावकर आदी महिलांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.कार्यक्रमाचे आयोजन नितीन बोरेकर मित्र मंडळ, यांच्यावतीने करण्यात आले आहे. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय सोहळ्याचा लाभघ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रन फॉर युनिटी राष्ट्रीय एकात्मता, शिस्त आणि देशभक्तीचा संदेश देणारा उपक्रम : पो.नि. दिनेश दहातोंडे

## नांदगाव पेठ पोलीस स्टेशनतर्फे उत्साहवर्धक आयोजन नागरिक, युवक, शालेय विद्यार्थी आणि महिला वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नांदगाव पेठ**

रन फॉर युनिटी ही केवळ एक धावस्पर्धा नाही, तर ती देशातील प्रत्येक नागरिकाला राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभावाची जाणीव करून देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. सरदार पटेल यांच्या विचारांची ताकद म्हणजे एकता, शिस्त आणि संघटनशक्ती असल्याचे प्रतिपादन नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी केले.लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, नांदगाव पेठ पोलीस स्टेशनच्या वतीने रन फॉर युनिटी हा राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि बंधुत्वाचा संदेश देणारा भव्य उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.




समाजातील विविध घटकांचा सहभाग लाभलेल्या या उपक्रमाने नांदगाव पेठ परिसरात देशभक्तीचा उत्साह जागवला.यावेळी तीन किलोमीटर अंतराची धाव स्पर्धा उत्साहात पार पडली. विविध वयोगटातील नागरिक, विद्यार्थी, खेळाडू, महिला आणि पोलीस कर्मचारी यांनी एकत्रितपणे सहभागी होत समाजात ऐक्याचा आणि शिस्तीचा आदर्श निर्माण केला.या प्रसंगी पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पीएसआय प्रदीप शहाणे, पीएसआय प्रवीण नवलकर यांच्यासह पोलीस कर्मचारी संजय देऊळकर, सुनील सोळंके, वैभव सवाईकर, राजीक खान, राजा खान, विजय आळे, अमित ढोले, शितल चक्रनारायण, सरिता वानखडे ,माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार, प्रा. मोरेश्वर इंगळे, राजन देशमुख, मनोज मोरे, सचिन इंगळे, संजय चौधरी आणि मोनू राठोड यांनी संयोजनात सक्रिय सहभाग घेतला रन फॉर युनिटी मध्ये शालेय विद्यार्थ्यांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचा सहभाग दिसून आला. अनेक पालक आपल्या मुलांसह धावले, ज्यातून एकतेचा आणि आरोग्यदायी जीवनाचा सुंदर संदेश देण्यात आला. धावपटूंनी देशभक्तीपर गाण्यांच्या तालावर आणि भारतमातेच्या जयघोषात मॅरेथॉन पूर्ण केली.यावेळी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली.कार्यक्रमादरम्यान पोलीस बंधू आणि नागरिक यांच्यातील आपलेपणा, शिस्त आणि परस्पर विश्वासाचे सुंदर दर्शन घडले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, शांतता समिती, पोलीस मित्र समिती, स्थानिक नागरिक, पत्रकार बांधव आणि स्वयंसेवी संस्था यांनी मनापासून सहकार्य केले.कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सहभागी धावपटूंना प्रमाणपत्रे प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. काही विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्कृष्ट सहभागासाठी विशेष प्रोत्साहनपर पुरस्कारही देण्यात आले.

# क्लच वायरच्या फासात अडकलेल्या कोल्ह्याला वनअधिकाऱ्यांनी दिला जीवदान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

आज शुक्रवार सकाळी १०.०० वाजता च्या सुमारास ईविन चौक, सुरज कॅफेच्या मागे असलेल्या तार कंपाऊंड परिसरात एका कोल्ह्याचा क्लच वायरच्या फासामध्ये अडकल्याचा प्रकार घडला. माहिती मिळताच अमरावती रेस्क्यू टीम तत्काळ घटनास्थळी पोहोचली व कोल्ह्याला सुरक्षिततरीत्या फिजिकल पद्धतीने सोडवून त्याच्या नैसर्गिक अधिवासात परत सोडण्यात आले.या



बचावकार्यामध्ये महेश धदर (वनपरिक्षेत्र अधिकारी), अमोल गावनेर (वनपाल), फिरोज खान (वनपाल), मनोज ठाकुर (वनमजूर), संदिप चौधरी (वाहन चालक) व सुशिल तायडे यांनी विशेष सहभाग नोंदविला.

# जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांना मिळणार १११७ कोटींचा मदतनिधी

## भाजपा आमदारांच्या पाठपुराव्याला यश : मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मानले आभार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

सततच्या पावसामुळे अमरावती जिल्ह्यातील झालेल्या शेतीच्या नुकसानीपोटी ५७० कोटी आणि रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता विशेष मदत म्हणून ५४७ कोटी रूपयांचा निधी देण्याचा निर्णय गुरूवारी शासनाने घेतला आहे.

मागील सहा दिवसापासून जिल्ह्यातील भाजपाचे आमदारांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे व वित्त विभाग तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या कडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. राज्यात केवळ अमरावती जिल्ह्याला हा निधी प्राप्त झाला असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दोन स्वतंत्र शासकीय निर्णय जाहीर झाले आहे. अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी हा निधी वितरित



करण्यात येत असल्याची माहिती पत्रकार परिषदेत आमदार प्रतापदादा अडसड यांनी दिली

**रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता मिळणार विशेष मदत**

अमरावती जिल्ह्यातील ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ४ लाख ८१ हजार ५०३ हेक्टर जमीन बाधीत झाली होती. यासाठी ४९० कोटी रूपयांचा निधी वितरीत केला आहे. तसेच दोन हेक्टरवरून तीन हेक्टर मर्यादा वाढ केल्यामुळे ५५ हजार २१२ शेतकऱ्यांना ६६ हजार ३७३ हेक्टरसाठी ७९ कोटी रूपयांचा निधी प्राप्त होईल. राज्यातील विविध जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी, पूर यामुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता विशेष मदत देण्यात येणार आहे. यात सप्टेंबर २०२५ मधील कालावधीमध्ये ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ५ लाख ४७ हजार ८७६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासाठी जिल्ह्याला ५४७ कोटी रूपयांची मदत मिळणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामामध्ये १० हजार रूपये प्रति हेक्टरी मदत, अर्थसहाय देण्याचा निर्णय १० ऑक्टोबर रोजी घेण्यात आला आहे. ही मदत ३ हेक्टरपर्यतच्या मर्यादित करण्यात येणार आहे

शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी भाजपाच्या सर्व आमदारांनी प्रथम जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरा केला जिल्हाधिकारी आशिष येरकर यांनीही प्रस्ताव सादर केले त्यामुळे ही मदत मिळण्यास सुलभ झाले असल्याचे पत्रकार परिषदेत आ.प्रतापदादा अडसड यांनी सांगितले

**मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे मानले आभार**

जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सप्टेंबर महिन्यात जिल्हा परिषदेत घेतलेल्या आढावा सभेत. कृषी विभागाला जिल्ह्यात अतिपावसामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानाचे सरसकट पंचनामे करण्याच आदेश दिले होते. त्यानुसार कृषी विभागाने १४ तालुक्यात अतिपावसामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानाचे पंचनामे केले कृषी विभागाच्या अहवालानुसार जिल्ह्यातील १४ तालुक्यात ५ लाख ४७ हजार ८७६.६५ हेक्टवरील शेती पिकांचे नुकसान झाल्याचा अहवाला कृषी विभागाने शासनाकडे सादर केला होता.

जिल्ह्यातील सर्व भाजपा आमदारांनी गत रविवारी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची नागपुरात भेट घेतली. दोन्ही मंत्री महोदयांनी राज्याच्या वित्त विभागाची चर्चा करून ३० ऑक्टोबर रोजी हे दोन्ही शासन निर्णय काढण्यात आले आहे त्यानुसार शासनाने विशेष बाब म्हणून अमरावती जिल्ह्यातील जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांना १११७ कोटींचा मदतनिधी चा शासकीय परिपत्रक काढले आहे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस ,राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे वित्त विभाग जिल्हा प्रशासनाचे भाजपाच्या सर्व आमदारांनी आज पत्रकार परिषदेत आभार मानले.

या पत्रकार परिषदेला आमदार प्रतापदादा अडसड, उमेश भाऊ यावलकर, राजेशजी वानखेडे व प्रवीणभाऊ तायडे उपस्थित होते.

# रिल बनवतांना रेल्वेच्या धडकेने युवकाचा मृत्यू, मित्र जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ बुलढाणा**

सोशल मिडीयाचा आणि रिळ बनवण्याचा नाद अनेकदा महागात पडतो.कधीकधी तर जीवावर बेततो. अशीच एक खळबळजनक अन तितकीच दुर्दैवी घटना आज शेगाव तालुक्यात घडली. रेल्वे लाईनवर उभे राहून रिळ बनवतांना एका युवकाचा रेल्वे खाली आल्याने मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी, ३० ऑक्टोबर रोजी संध्याकाळी घडली. या दुर्घटनेत त्याचा मित्र देखील गंभीर झाला आहे.मृतकाचे नाव शेख नदीम शेख रफिक असून तो खामगाव तालुक्यातील पिंपळगाव काळे येथील रहिवासी आहे. त्याचेसोबत असलेला त्याचा मित्र गंभीर जखमी आहे.


याबाबत मिळालेली माहिती अशी की, शे.नदीम शे.रफिक हा आज दुपारी तालुक्यातील आळसणा गावात लग्नाच्या 'रिसेप्शन'च्या कार्यक्रमासाठी गेला होता. यावेळी नदीम व त्याच्या मित्राला आळसणा गावालगत असलेल्या रेल्वेलाईनवर रिळ बनविण्याचा मोह सुटला. रेल्वेलाईनवर रिळ बनवण्यात मग्न असताना व कानात हेडफोन लावलेले असल्याने रेल्वे आल्याचे नदीमला कळले नाही आणि तो रेल्वेच्या खाली आला. ज्यामुळे त्याला आपल्या प्राणास मुकावे लागले. नदीमचा मित्र सुध्दा गंभीर जखमी झाला आहे. त्याचेवर शेगाव येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती शेगाव ग्रामिण पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी शे.नदीमचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शेगाव येथील शासकीय रूग्णालयात आणला होता. या दुर्दैवी घटनेची वार्ता वाऱ्यासारखी पसरताच समाजमन सुन्न झाले. नदीमच्या मृत्यूबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारांना मोठा दिलासा; खर्च मर्यादेत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

महापालिका निवडणुका जाहीर होण्याच्या तोंडावर नगरसेवकपदाच्या इच्छुक उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने उमेदवारांच्या खर्च मर्यादेत तब्बल तिप्पटपेक्षा जास्त वाढ केली असून, आता नागपूरसह 'अ' वर्ग महापालिकांमधील उमेदवारांना १५ लाख रुपये इतका खर्च करता येणार आहे. यापूर्वी ही मर्यादा केवळ चार लाख रुपये इतकी होती.

२०१७ नंतर तब्बल आठ वर्षांनी महापालिकांच्या निवडणुका होत असल्याने राजकीय पक्षांकडून तयारीला वेग आला आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ६ नोव्हेंबर रोजी मतदारयादींचे प्रारूप प्रसिद्ध होईल, तर ११ नोव्हेंबरपासून प्रभागनिहाय आरक्षण प्रक्रियेची सुरुवात होणार आहे. त्यामुळे निवडणुकीचा कार्यक्रम आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. अशा पार्श्वभूमीवर खर्च मर्यादेत झालेली वाढ उमेदवारांसाठी अत्यंत दिलासादायक ठरली आहे.



यापूर्वीच्या चार लाखांच्या मर्यादेबाबत उमेदवार आणि पक्षांकडून वारंवार नाराजी व्यक्त करण्यात येत होती. प्रत्यक्षात प्रचारासाठी लागणारा खर्च जसे की चहा-नाश्ता, प्रचार वाहन, बॅनर, जाहिरात आदी या मर्यादेत बसत नव्हता. उदाहरणार्थ, चहा-नाश्त्यासाठी केवळ २५ रुपये, तर प्रचार वाहनासाठी १२०० रुपये इतका खर्च दर्शविण्यात येत होता. त्यामुळे ही मर्यादा वास्तवाशी विसंगत असल्याची टीका होत होती. अखेर या मागणीनंतर खर्च मर्यादेत मोठी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, या निर्णयामुळे बेहिशेबी निधीवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होईल. तथापि, निवडणुकीदरम्यान होणाऱ्या अफाट खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही ते सांगतात.

सुधारित मर्यादेनुसार, 'ब' वर्ग महापालिका (पिंपरी-चिंचवड, नाशिक, ठाणे) साठी १३ लाख रुपये, 'क' वर्ग (कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार) साठी ११ लाख रुपये, तर 'ड' वर्ग नागरी संस्था साठी नऊ लाख रुपये इतकी खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच नगर परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांसाठीही खर्च मर्यादेत वाढ करण्यात आली आहे.या निर्णयामुळे येणाऱ्या निवडणुकीत उमेदवारांना प्रचारासाठी अधिक आर्थिक स्वातंत्र्य मिळेल, मात्र पारदर्शकता टिकवण्यासाठी नियंत्रण यंत्रणांनी अधिक दक्ष राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शेतकरी आंदोलन : बच्चू कडू, राजू शेट्टींसह २ हजार आंदोलकांवर गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नागपूर**

सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी सलग २४ तास नागपूर- हैदराबाद महामार्गावर चक्का जाम करत वाहतूक कोंडी करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विस्कळीत केल्या प्रकरणात पोलिसांनी माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांच्यासह सुमारे २००० आंदोलकांवर गुन्हे दाखल केले



शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली २८ ऑक्टोबरपासून कार्यकर्त्यांनी वर्धा मार्गावरची वाहतूक व्यवस्था वेठीस धरली होती. या महा एल्गार आंदोलनासाठी कापूस संशोधन केंद्राच्या शेजारचे मैदान आरक्षित केले असतानाही आंदोलकांनी रस्त्यावर ठाण मांडले. परिणामी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि महामार्गावरची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वेठीस धरली गेल्याने हजारो गाड्या अडकून पडल्या. नेत्यांच्या चिथावणीखोर आणि प्रक्षोभक भाषणांमुळे परिस्थिती तणावपूर्ण झाल्याचा ठपकाही पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातून ठेवला आहे.हिंगणा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या गुन्ह्यात बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांच्यासह माजी मंत्री महादेव जानकर, रविकांत तुपकर (बुलढाणा), नितेश कराळे (वर्धा), वामनराव चटप (चंद्रपूर) आणि बबलू जवंजाळ (अमरावती) यांच्यासह २००० हून आंदोलकांच्या नावाचा उल्लेख केला आहे. हिंगणा निषेधाच्या अटींचे उल्लंघन करणे, बेकायदेशीरपणे गर्दी जमवणे, नागरिकांचे जीवन आणि मालमत्ता धोक्यात आणणे आणि वाहतुकीला अडथळा आणणे यासारख्या कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

**उशिरा सुचले शहाणपण**

या महा एल्गार मोर्चात १० ते १२ हजार शेतकरी सहभागी होतील, असा अंदाज पोलिसांच्या गुप्तचर शाखेने व्यक्त केला होता. मात्र त्यापेक्षा दुपटीने अधिक शेतकरी आंदोलनात उतरले. त्यामुळे आधीच आंदोलनाचे नियोजन फसले. शिवाय बंदोबस्ताच्या बाबतीत पोलिसांनी देखील हे आंदोलन अत्यंत निष्काळजीपणे हाताळले. आंदोलकांना रस्त्यावर उतरण्यापासून पोलीस रोखू शकले नाहीत. त्यामुळे २४ तास हजारो वाहने महामार्गावर तुंबली. न्यायालयाने त्याची दखल घेत वाहतूक कोंडी फोडली असली तरी उशीरा का होईना ढिसाळपणातून धडा घेत पोलिसांनी आता आंदोलनस्थळी तडगा पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. प्रत्येक हालचालींवर पोलीस बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

# गळ्यात हार, डोक्यावर फुलं, कर्जमाफीची तारीख येताच कडूंचे नागपुरात जंगी स्वागत....



शेतकरी नेते बच्चू कडू नागपुरात परतले असून, शेतकरी कर्जमाफी आंदोलनाबाबत त्यांनी सरकारला इशारा दिला आहे. 'जेथपर्यंत शेतकऱ्याच्या खात्यात पैसे येत नाही तोपर्यंत लढाई चालू राहील,' असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले आहे. नागपूर विमानतळावर आगमन होताच कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. सरकारने कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली असून ३० जूनपर्यंतची मुदत मागितली आहे, असे ते म्हणाले. मात्र, जोपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होत नाहीत, तोपर्यंत आमचा लढा संपलेला नाही आणि सरकारवर आमची बारीक नजर असेल, असेही त्यांनी नमूद केले. आपल्यावरील टीकेला उत्तर देताना, टीका करणारे हे पक्षाचे गुलाम असून काही पैसे घेऊन कमेंट्स करतात, अशा शब्दात त्यांनी टीकाकारांचा समाचार घेतला.

# एकता दौड : अमरावतीत 'रन फॉर युनिटी' सरदार पटेल जयंतीनिमित्त पोलीस आयुक्तालयातर्फे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री आणि देशाचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त अमरावती पोलीस आयुक्तालय तर्फे 'रन फॉर युनिटी' या एकात्मतेच्या संदेशाने प्रेरित धावण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आज ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजता ही स्पर्धा सुरू करण्यात आली यावेळी पोलीस मुख्यालय - सुंदरलाल चौक - बियाणी चौक - गर्ल्स हायस्कूल - इर्विन चौक - रेल्वे स्टेशन - बसस्टँड ते पोलीस मुख्यालय असा निश्चित करण्यात आला होता

या उपक्रमात अमरावती शहरातील सर्व नागरिक, प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी, राजकीय आणि सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, बंधू-भगिनी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

'एक भारत - श्रेष्ठ भारत' या घोषवाक्याखाली आयोजित कार्यक्रमातून राष्ट्रीय एकता, देशप्रेम आणि सामाजिक सौहार्दाचा संदेश ही यावेळी देण्यात आला.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत